
बुधवार, ३ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १०७
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

मैत्रिणीशी विवाहास विरोध केल्याने ‘त्या’ मुलाची हत्या/२
दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या/५
टीम इंडियाचा सामना आज अफगाणिस्तानशी/६

## खाद्यतेलाच्या किमती कमी करण्याचा कंपन्यांचा निर्णय



**मुंबई** : दिवाळीच्या निमित्ताने जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. खाद्यतेलाचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी तेलाच्या किमती कमी करण्याचा निर्णय जाहीर केला असून याचा फायदा ग्राहकांना होणार आहे. त्यामुळे ऐन दिवाळीच्या तोंडावर सामान्यांसाठी ही दिलासादायक बाब मानली जात आहे. देशात खाद्यतेलाचे उत्पादन करणाऱ्या अनेक मोठ्या कंपन्यांनी तेलाच्या होलसेल किमतीमध्ये घट करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अदानी विलमर, रूची सोया, जेमिनी एडिबल्स, मोदी नॅच्युरल्स, गोकुळ रिफॉइल्स, विजय सॉल्वेक्स, गोकुळ ॲग्रो आणि एन. के. प्रोटेन्स या कंपन्यांचा समावेश आहे. सॉल्वेंट एक्ट्रॅक्टर्स असोसिएशन अर्थात एसईएने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन या कंपन्यांनी आपल्या तेलाच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अनिल देशमुख यांना अटक

## ■ ६ नोव्हेंबरपर्यंत ईडी कोठडी; दिवाळी जेलमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. १०० कोटींची वसुली आणि पैशांच्या अफरातफरीचा (मनी लॉण्डरिंग) आरोप असलेले देशमुख सोमवारी सकाळी अचानक ईडी कार्यालयात हजर झाले होते. १३ तास चौकशी केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. विशेष न्यायालयाने देशमुख यांना ६ नोव्हेंबरपर्यंत अंमलबजावणी ईडीची कोठडी सुनावली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून गायब असलेले अनिल देशमुख हे सोमवारी प्रथमच समोर आले आणि ईडीच्या कार्यालयात पोहचले. या वेळी देशमुख



यांच्यासोबत त्यांचे वकीलही उपस्थित होते. दिवसभर देशमुख यांची चौकशी झाली. सायंकाळी साडेसातच्या सुमारास दिल्लीतील काही अधिकारी ईडी कार्यालयात दाखल झाले. त्यानंतर पुन्हा देशमुख यांची चौकशी झाली आणि अखेर रात्री उशिरा त्यांना ईडीकडून अटक करण्यात आली.

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी अनिल देशमुख यांच्यावर निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे याच्याकडून १०० कोटींची वसुली केल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी ईडीने तपास करीत देशमुख यांच्या घर आणि कार्यालयावर छापे टाकले होते. ईडीच्या अटकेची कारवाई टाळण्यासाठी देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली, पण कोर्टाने त्यांची याचिका फेटाळून लावली होती.

### ‘चुकीला माफी नाही’

*अनिल देशमुख यांच्या अटकेवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मार्मिक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. कुणाचाही कार्यकर्ता असू दे. चूक माफ केली जाणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१४मध्ये सांगितले होते. देशातून, राज्या-राज्यांतून भ्रष्टाचाराला हद्दपार करायचेय. देशमुखांच्या बाबतीत शेवटी हे व्हायचे तेच झाले. ईडीने अनेक वेळा समन्स देऊनही ते हजर राहिले नाही. शेवटी चुकीला माफी नाही, असे पाटील म्हणाले.*

## जेएनपीटीच्या जासई उड्डाणपुलाचा भाग कोसळला

# एक कामगार ठार, सहा जण गंभीर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



जेएनपीटीच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या जासई उड्डाणपुलावर काम सुरू असताना मंगळवारी (दि. २) सायंकाळी ५.१५ वाजताच्या सुमारास दुर्घटना घडली. पीयर कॅपचे काँक्रीट भरताना परातीला बूम प्लेअर क्रेनचा धक्का लागून ते अचानक कोसळले. यात एक कामगार जागीच ठार झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

जेएनपीटी परिसरात जेएनपीटीच्या माध्यमातून तीन हजार कोटी खर्चून सात उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत. त्यापैकी दास्तान ते शंकर मंदिरदरम्यान दीड किमी लांबीच्या जासई उड्डाणपुलाचे काम दोन वर्षांपासून सुरू आहे. येथील ५० पीयर कॅपपैकी २० क्रमांकाच्या पीयर कॅपचे काम मंगळवारी चालू असताना १४ मीटर उंचीवर स्लॅब भरण्याच्या कामासाठी परातीही बांधण्यात आल्या होत्या. त्यावर १०-१५ कामगार काम करीत होते. या वेळी अचानक परातीला स्लॅब भरणाऱ्या बूम प्लेअरचा धक्का लागला. **(पान २ वर..)**

# प्रकल्पग्रस्तांवर सिडकोकडून अन्यायाचा कहर

## धुतूमच्या दत्तू ठाकूर यांची प्रकृती चिंताजनक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या हक्कांसाठी वारंवार सिडकोकडे मागणी करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांकडे सिडको ढुंकूनही पाहात नसल्याचे दत्तू भिवा ठाकूर या वयोवृद्ध प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. दत्तू ठाकूर यांची प्रकृती चिंताजनक आहे, मात्र सिडकोला प्रकल्पग्रस्तांच्या वेदनेपेक्षा बांधकामही सुरू न झालेल्या विमानतळाच्या नामकरणात अधिक स्वारस्य असल्याचे दिसून आले.

उरण तालुक्यातील धुतूम गावचे प्रकल्पग्रस्त शेतकरी दत्तू ठाकूर यांनी सोमवारी (दि. १) सिडको भवनातच आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना सीबीडी बेलापूर येथील एमजीएम रुग्णालयात व्हेंटिलेटरवर ठेवले आहे. लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या आंदोलनातील बिनीचे शिलेदार म्हणून ओळखले जाणारे ८० वर्षांचे दत्तू ठाकूर प्रकल्पग्रस्त शेतकरी आहेत. त्यांनी यापूर्वीही सिडकोला वारंवार लेखी सूचना देऊनदेखील सिडकोच्या अधिकाऱ्यांनी इतर प्रकल्पग्रस्तांप्रमाणे त्यांच्याकडेही दुर्लक्षच केले. त्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न करण्यापूर्वी दत्तू ठाकूर यांनी हे स्पष्ट केले की, माझ्यावर कोणतेही कर्ज नाही, तसेच मी कर्जमाफीसाठीही आत्महत्या करीत नाही. मला माझ्या हक्काच्या लढ्याला न्याय मिळावा म्हणून मी आत्महत्या करीत आहे. **(पान २ वर..)**

> **सिडको प्रशासन आता प्रकल्पग्रस्तांची पर्वा करीत नसल्याचे दत्तू ठाकूर यांच्यावर ओढवलेल्या परिस्थितीवरून दिसते. विमानतळाचे कामही सुरू झालेले नसताना विमानतळाला नाव देण्याची घाई करणाऱ्या सिडकोला प्रकल्पग्रस्तांची वर्षानुवर्षाची प्रतीक्षा संपवायला वेळ मिळत नाही, ही दुर्दैवाची आणि संतापजनक बाब आहे.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर**, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष

# आरपीएलची व्यवस्था आंतरराष्ट्रीय लीगच्या दर्जाची

## ■ आमदार आशिष शेलार यांचे गौरवोद्गार; स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड प्रीमियर लीगची (आरपीएल) व्यवस्था ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील लीगच्या दर्जाची असल्याचे गौरवोद्गार माजी शिक्षणमंत्री तथा आमदार आशिष शेलार यांनी मंगळवारी (दि. २) काढले. आरपीएलच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली असून शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके मैदानात ही स्पर्धा १२ नोव्हेंबरपर्यंत रंगणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप नेते आमदार शेलार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन सोहळ्यास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, **(पान २ वर..)**



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

## निवडक

### अजित पवार यांना आयकर विभागाची नोटीस

**मुंबई** : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना आयकर विभागाने नोटीस पाठवली आहे. हा ठाकरे सरकारसाठी मोठा धक्का मानला जात आहे. मालमत्तांवर कारवाई करण्यासंदर्भात पवार यांना नोटीस पाठवण्यात आल्याचे वृत्त आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अजित पवारांकडे एक हजार कोटींहून अधिक बेनामी संपत्ती असल्याचा आरोप केला होता.

### कॅ. सिंग यांचा काँग्रेस सदस्यपदाचाही राजीनामा

**चंदिगड** : कॅ. अमरिंदर सिंग यांनी अखेर काँग्रेसच्या सदस्यपदाचाही राजीनामा दिला आहे. यासोबतच त्यांनी आपल्या नव्या ‘पंजाब लोक काँग्रेस’ पक्षाची घोषणा केली आहे. राजीनामा सादर करताना त्यांनी पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांना सात पानांचे पत्र लिहिले असून काँग्रेससाठी दिलेल्या योगदानाचा इतिहास मांडलाय.



# मराठी साहित्य संस्कृतीच्या उज्ज्वल परंपरेतील दिवाळी अंक महत्त्वाचा भाग

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी साहित्य संस्कृतीला उज्ज्वल परंपरा असून दिवाळी अंक यातील एक महत्त्वाचा भाग आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २) येथे केले.

ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर संपादित दै. किल्ले रायगडच्या ५५व्या, अविनाश कोळी संपादित सा. हक्काचे व्यासपीठच्या सातव्या, अनिल राय संपादित सा. स्टार पनवेलच्या पाचव्या आणि मनोज घोसाळकर संपादित सा. रोहा टाईम्सच्या १५व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मराठी साहित्याचे क्षेत्र हे भव्य आणि दिव्य आहे. या साहित्याला इसवी सनाच्या बाराव्या शतकापासूनची, म्हणजे सुमारे साडेआठशे वर्षांची परंपरा आहे. **(पान २ वर..)**

## सोशल मीडियावर आक्षेपजनक पोस्टमुळे खोपोलीत तणाव

**खोपोली : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत नुकत्याच झालेल्या भारताविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तान संघ जिंकला. या संदर्भात सोशल मीडियावर खालापूर तालुक्यातील एका तरुणाने आक्षेपजनक पोस्ट टाकली. ही पोस्ट झपाट्याने व्हायरल झाल्यानंतर खोपोलीत तणाव निर्माण झाला होता.

अनेक राष्ट्रप्रेमी तरुणांनी या पोस्टला आक्षेप घेत मंगळवारी (दि. २) सकाळी खोपोली पोलीस ठाण्यावर धडक देत संबंधित तरुणावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली, मात्र त्यांना खोपोली पोलिसांकडून प्रतिसाद मिळाला नाही. अखेर तरुणांनी खालापूर पोलीस ठाण्यात निवेदन दिले.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

# नकली पिस्तुलाने चोरी करण्याचा डाव उधळला

■ **अलिबागच्या सहाण गोठीमधील घटना**
■ **ग्रामस्थांनी चोपून केले पोलिसांच्या हवाली**

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवाळीतील पिस्तुलाचा धाक दाखवून अलिबाग तालुक्यातील सहाणगोठी परिसरात लोकांना लुटण्याचा प्रयत्न चार चोरट्यांच्या अंगलट आला आहे. गावकऱ्यांनी त्यांची यथेच्छ धुलाई करून पोलिसांच्या हवाली केले. या चोरांकडून आठ मोबाइल, रिक्षा, आणि पिस्तूल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अलिबाग तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून चोरट्यांचा सुळसुळाट झाला असून सहाण गोठी परिसरात चार चोर रिक्षा घेऊन हत्यारासह आल्याचे कळले. त्यामुळे ग्रामस्थ सावध होऊन या चोरांचा माग घेऊ लागले. त्या वेळी दोन जण ग्रामस्थांच्या हाती लागले आणि उर्वरित दोघे जंगल भागात पळाले. गावकऱ्यांनी त्यांनाही पकडून यथेच्छ चोप दिला. या वेळी चोरट्यांकडे तपासणी केली असता एक पिस्तूल, आठ मोबाइल असा ऐवज सापडला. पिस्तूल पाहून ग्रामस्थ भयभीत झाले. त्यांनी चोरांना अलिबाग पोलिसांच्या ताब्यात दिले.

अलिबाग पोलिसांनी पिस्तूलची तपासणी केली असता, ते दिवाळीत फटाके फोडण्यासाठी वापरले जाणारे असल्याचे समजले. खेळण्यातील पिस्तुलचा धाक दाखवून लुटण्याचा चोरट्यांचा डाव होता, मात्र तो उधळला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पनवेलमध्ये शुक्रवारी स्वरसम्राट राहुल देशपांडे यांच्या मैफलीची पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रसिक श्रोत्यांच्या खास आग्रहास्तव भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय युवा मोर्चा पनवेलच्या वतीने स्वरसम्राट राहुल देशपांडे यांच्या गाण्यांची मैफल अर्थात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. ५) सकाळी ६ वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे रंगणार आहे.



सोनेरी पहाट आणि सुरांची सुरेल बरसात असे दिवाळी पहाटचे एक अनोखे नाते आहे. दिवाळी पहाटची सुरेल परंपरा जपायला मराठी रसिकांना आवडते. हा अनुभव पुढील अनेक दिवसांसाठी नवा उत्साह देणारा ठरतो. त्या अनुषंगाने सुरेल गाण्यांची मैफल असलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

पनवेलमधील संगीतमय दिवाळी पहाटचे हे पाचवे वर्ष आहे. दर्जेदार कार्यक्रम, तसेच उत्तम नियोजनामुळे या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांची गर्दी होत असते. त्यामुळे या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी प्रवेशिका अनिवार्य असून ती निःशुल्क आहे. अधिक माहिती व निःशुल्क प्रवेशिकांसाठी चिन्मय समेळ (८७६७१४९२०३), अभिषेक भोपी (९८२०७०२०४३), रोहित जगताप (८६९१९३०७०९), गौरव कांडपिळे (९९२०८६८००८), आकाश डोंगरे (९९३०३१९८३२), सिद्धार्थ मोहिते (८८७९२१६६६९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

वडाळे तलावाच्या सुशोभीकरणाने पनवेलच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे आणि हा दिवाळी पहाट कार्यक्रम त्या ठिकाणी प्रथमच होत असल्याने रसिकांच्या मनात कार्यक्रमाची उत्सुकता आहे.

## खारघरमध्ये उद्या ‘दिवाळी पहाट’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खारघर-तळोजा मंडलच्या वतीने भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. ४) सकाळी ६ वाजता खारघरमध्ये गाण्यांची सुरेल मैफल म्हणजेच दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर १२मधील ग्रीन फिंगर शाळेजवळील गावदेवी मैदानात हा कार्यक्रम होणार असून यात प्रीती निमकर-जोशी, अनिरुद्ध भिडे, आदिती प्रभुदेसाई, प्रणय पवार मैफल सादर करतील. यासाठी प्रवेश निःशुल्क असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप खारघर-तळोजा मंडलच्या वतीने करण्यात आले आहे.



# इलेक्ट्रिकल डिप्लोमाधारक निघाला घरफोड्या करणारा

## रायगड पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या विविध भागांत घरफोडी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) जेरबंद केले आहे. त्याच्याकडून एकूण ११ गुन्हे उघडकीस आले असून १५ लाख २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. संकेत मुकुंद आंजर्लेकर असे आरोपीचे नाव असून तो इलेक्ट्रिकल डिप्लोमाधारक आहे तसेच महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात लॅब असिस्टंट म्हणून तात्पुरता नोकरीस आहे.

मागील काही दिवसांपासून रायगड जिल्ह्यात घरफोडीचे गुन्हे वाढीस लागले होते. त्यामुळे सामान्य माणसाबरोबरच पोलीस यंत्रणा चिंतेत होती. अधीक्षक अशोक दुधे व अपर अधीक्षक अतुल झेंडे यांनी याचा गांभीर्याने विचार करून स्थानिक गुन्हे शाखेची खास पथके निरीक्षक दयानंद गावडे यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आली. या गुन्ह्यांचा तातडीने छडा लावण्याचे आदेश यंत्रणांना दिले.

गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक विकास चव्हाण यांच्याकडे दापोलीतील आरोपी संकेत आंजर्लेकर याची माहिती होती. हा पोलीस रेकॉर्डवरील अशा अनेक गुन्ह्यांतील रेकॉर्डवर होता. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्यांची कबुली दिली. महाडमधील सहा, गोरेगाव आणि तळामधील प्रत्येकी दोन, तर माणगावमध्ये एक गुन्हा केल्याचे त्याने सांगितले. या गुन्ह्यांमध्ये दागिने आणि रोख रक्कम मिळून १९ लाख ५३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला होता. त्यापैकी १५ लाख २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. एकूण ७७ टक्के मालमत्ता हस्तगत केल्याचे अधीक्षक अशोक दुधे यांनी सांगितले.



पनवेल : मनोरंजन अनलॉक अंतर्गत मंदार काणे एंटरटेन्मेंट आणि स्वराली संगीत विद्यालयाच्या वतीने दिवाळी पहाट भक्तीमय रंग या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजपचे नंदू पटवर्धन, नगरसेवक राजू सोनी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात पं. जयतीर्थ मेउंडी यांनी गायनाची कला सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



पनवेल : भाजप नेते स्व. लक्ष्मणशेठ पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांकडून विविध सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक कार्याचा वारसा चालवण्यात येत आहे. त्याअंतर्गत स्व. जनाबाई लक्ष्मणशेठ पाटील यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालयाला एक आयसीयू बेड स्व. लक्ष्मणशेठ पाटील व स्व. अविनाश लक्ष्मणशेठ म्हात्रे यांच्या परिवारातर्फे भेट म्हणून देण्यात आला आहे. या वेळी नगरसेविका चारुशीला घरत, रुचिता लोंढे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील आदी उपस्थित होते.

# मैत्रिणीशी विवाहास विरोध केल्याने नातेवाईकाच्या मुलाची केली हत्या

## ▪ माणगावमधील गुन्ह्याचे गूढ उकलले

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणगावमधील बालकाचे अपहरण व हत्येमागचे कारण पोलिसांनी तपासाअंती समोर आणले आहे. आपल्या मैत्रिणीशी विवाह करण्यास नातेवाईकांनी विरोध दर्शविल्याने आरोपीने दोन वर्षांच्या मुलाचे अपहरण करून त्याची हत्या केल्याची माहिती रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी मंगळवारी (दि. २) पत्रकार परिषदेत दिली. आरोपी संतोष अशोक यादव मैत्रिणीचीही हत्या करण्याच्या तयारीत असताना पोलीस पथकाने त्याला पकडले, असेही दुधे यांनी सांगितले.



माणगाव तालुक्यातील बोर्ले येथील संतोष यादव याने त्याच्या भावाचा दोन वर्षीय मुलगा रूद्र अरुण यादव यास खाऊ देण्यासाठी दुकानात घेऊन जातो, असे सांगून गेला तो परतलाच नाही. म्हणून मुलाच्या आईने माणगाव पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. या घटनेत पोलिसांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला (एलसीबी) तपास करण्यास सांगितले. एलसीबीच्या पथकाने आरोपी संतोषच्या मोबाइल नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता, तो मुंबईतील एका मित्राच्या संपर्कात असल्याचे आढळले. म्हणून त्याच्या मित्राकडे अधिक विचारपूस केली असता, त्याने रूद्रला जीवे मारून रोहा हद्दीत टाकून दिल्याचे सांगितले, तसेच तो त्याची गुजरातमधील सिल्वासा येथे राहणाऱ्या मैत्रिणीबाबत विचारपूस करीत असल्याचे समजले. त्यानंतर त्याचा शोध घेत एलसीबीचे पथक सिल्वासा येथे गेले. संतोष त्याची मैत्रीण राहत असलेल्या इमारतीजवळ आला असता, त्याला या पथकाने अटक केली.

पान १ वरून

## जेएनपीटीच्या जासई उड्डाणपुलाचा भाग कोसळला

या धक्क्याने परात स्लॅब, स्टील, मलब्यासह खाली कोसळली. यात एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जेएनपीटी आणि एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची माहिती उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली. त्याचप्रमाणे त्यांनी या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, मलबा बाजूला करण्याच्या कामासाठी जेएनपीटी गव्हाण फाटादरम्यानची वाहतूक सुमारे दोन तास बंद करण्यात आली होती.

या संदर्भात ठेकेदार जे. कुमार कंपनीचे सहाय्यक अभियंता पीराजी कांबळे यांनी, पीयर कॅप भरताना परातीला अचानक बूम प्लेअर क्रेनचा धक्का लागून स्टील, परात, मलब्यासह कोसळून अपघात झाला असल्याची माहिती दिली.

## प्रकल्पग्रस्तांवर सिडकोकडून अन्यायाचा कहर

या घटनेची माहिती पनवेल-उरणसह इतर भागांतील प्रकल्पग्रस्तांना मिळाली असता, त्यांच्याकडूनही संतापाची भावना व्यक्त होऊ लागली आहे. सिडको आता आमचा अंत किती पाहणार आहे, असेही प्रकल्पग्रस्त शेतकरी बोलू लागले आहेत.

सिडकोकडे गेली अनेक वर्षे साडेबारा टक्के विकसित भूखंडाची मागणी लेखी पत्र, निवेदने देऊन अधिकाऱ्यांनी कोणतीही दाद न दिल्याने अखेरीस दत्तू ठाकूर यांनी टोकाचे पाऊल उचलून सिडको भवनातच आत्महत्येचा प्रयत्न केला. नियाजी जमिनीचे मालक वा कुळ असणाऱ्यांचा साडेबारा टक्क्यांच्या योजनेत समावेश होणार नाही, अशी भूमिका घेऊन सिडकोने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दाद देणेच बंद केले.

आमदार प्रशांत ठाकूर हे सिडकोचे अध्यक्ष असताना एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता. द्रोणागिरी परिसरातील ग्रामस्थांना त्या परिसरात विकसित भूखंड देणे शक्य नव्हते. त्यामुळे गव्हाण फाटा परिसरात 'बटरफ्लाय झोन' तयार करून तेथे विकसित भूखंड द्यावेत, असा निर्णय घेण्यात आला होता, मात्र त्यानंतर सिडकोकडून काहीच कारवाई झाली नाही.

व्यावसायिक 'लाभाच्या' भूखंडाबाबत उत्साही असलेले सिडकोचे अधिकारी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर मात्र उदासीन भूमिका घेतात आणि वारंवार आपल्या हक्काच्या जागेसाठी कायदेशीर मागणी करणारे दत्तू ठाकूर यांना मात्र आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागतो, असे दिसून येत आहे.

## आरपीएलची व्यवस्था आंतरराष्ट्रीय लीगच्या दर्जाची

नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव फडके, शिरढोण ग्रामपंचायतीच्या सरपंच संजना कातकरी, उपसरपंच संगीता चौधरी, सदस्य प्रमोद कर्णेकर, गजानन घरत, विजय भोपी, भाऊ कर्णेकर, राम वाजेकर, रेश्मा वाजेकर, निकिता चौधरी, सानिका कातकरी, मोनाली घरत, भगवान मुकादम, पांडुरंग चौधरी, नारायण चौधरी, जनार्दन वाकडीकर, मोहन कडू, रोहन पाटील, आयोजक मंगेश वाकडीकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

आपल्या मनोगतात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, शिरढोणला क्रांतिवीरांचा वारसा लाभला आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वेगवेगळ्या पद्धतीचे कार्यक्रम या मैदानात वर्षभर साजरे होत असतात. त्यामुळे पुढच्या पिढीला यातून विविध कार्यक्रम आयोजित करण्याची प्रेरणा मिळेल.

या वेळी महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी व पद्मभूषण पांडुरंगशास्त्री आठवले क्रिकेट स्टॅण्डचे उद्घाटन आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. रायगड क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १२७व्या जयंतीनिमित्त अचानक मित्र मंडळ व शिरढोण ग्रामस्थांच्या वतीने आरपीएल आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे यू-ट्युबद्वारे थेट प्रक्षेपणही केले जात असून दर्शकांचा उत्तम प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे.

## मराठी साहित्य संस्कृतीच्या उज्ज्वल परंपरेतील दिवाळी अंक महत्त्वाचा भाग

यात संतसाहित्य, पंतसाहित्य, तंतसाहित्य, इंग्रजी आमदानीतील मराठी साहित्य, स्वातंत्र्यपूर्व साहित्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य, आधुनिक साहित्य, साठोत्तरी साहित्य, १९९०नंतरचे साहित्य असे परिणामकारक टप्पे आहेत. काव्य, कादंबरी, कथा, लेख, नाटक इत्यादी अनेकानेक साहित्यप्रकार हे मराठी साहित्यात संपन्नतेने हाताळले गेलेले आहेत. त्या अनुषंगाने विविध माहितीने नटलेला दिवाळी विशेषांक हा साहित्य संस्कृतीमधील अनमोल ठेवा आहे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले.

या प्रकाशन सोहळ्यास सुप्रसिद्ध गजलकार ए. के. शेख, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, गणेश कोळी, रत्नाकर पाटील, दै. किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, प्रदीप वालेकर, सा. हक्काचे व्यासपीठचे संपादक अविनाश कोळी, स्टार पनवेलचे संपादक अनिल राय, सा. रोहा टाईम्सचे संपादक मनोज घोसाळकर, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, विवेक पाटील, मंदार दोंदे, हरेश साठे, विशाल सावंत, अनिल भोळे, अनिल कुरघोडे, अनिस मनियार, राज भंडारी, विशाल सावंत, विकास पाटील, छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर, प्रवीण मोहोकर, कोमल कोळी, विकास घरत, सुमेधा लिम्हण, परेश सेठे, रूपेश तळुसकर, विलास बोडके, विशाल सावंत, शैलेश गावंड, नारायण खुले, रूपेश भोईर, रवींद्र चौधरी आदी उपस्थित होते.











पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. ३ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल ▪ १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोव्हॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर


# कोकण विभागीय पेन्शन अदालत येत्या मंगळवारी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत येत्या मंगळवारी (दि. ९) सकाळी ११ वा. कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित केली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास या दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शनधारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शनविषयी प्रश्न उपस्थित करावे, असे तहसीलदार, कोकण विभाग यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. घनश्याम सदाशिव पाटील यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे - बेलोंडाखार, तालुका - उरण, जिल्हा - रायगड.**

| गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ८३/८ | ०-४५-२०<br>पो.ख. ०-०२-१०<br>एकूण ०-४७-३०<br>पैकी घनश्याम सदाशिव पाटील यांच्या हिश्याचे ०-२३-६५ | ६.६९ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०२/११/२०२१.**

**सही/-**
**अ‍ॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, **श्री. पांडुरंग परशुराम म्हात्रे,** राहणार घर क्र. ११६/अ, मुंबई-गोवा रोड, नवेगाव, पो. डोलवी, ता. पेण, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीच्या, ताबेकब्जातील आणि वहिवाटीतील **मौजे: खांडसई, तालुका- सुधागड, जिल्हा- रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे: खांडसई, तालुका- सुधागड, जि. रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| खांडसई | ७ | ३ | १-२९-००<br>पो.ख. ०-२९-००<br>एकूण १-५८-०० | ०-५२ |

आमचे अशिलांनी सदर मिळकत वर नमूद जमीन मालकांकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे निश्चित आहे. सबब सदर मिळकतीचे खरेदीखत करण्यापूर्वी सदर मिळकतीचे मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत असून सदर मिळकत वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळ-वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकती नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरीत करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक : ०२/११/२०२१**

**सही/-**
**अ‍ॅड. समीर शांताराम म्हात्रे**
बी.एस.सी.एल.एल.बी.
**कार्यालयीन पत्ता : १०२, पहिला मजला, श्री बालाजी को.ऑ.हौ. सोसायटी, नित्यानंद रोड, सारस्वत बँकेच्या वर, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, मो. ९८२१६५७४५६**

# दिवाळीनिमित्त कलाकारांना व्यासपीठ

## नगरसेविका राजश्री वावेकर यांचा उपक्रम; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संस्कृती ही उत्सवांची संस्कृती म्हणून ओळखली जाते. देशातील वेगवेगळ्या राज्यांतील संस्कृती एकमेकांना पूरक स्वरूपाच्या आहेत. सणांच्या निमित्ताने समाजातील कलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठाची आवश्यकता असते. अशा वेळी नगरसेविका राजश्री वावेकर यांनी कलाकारांना दिवाळीनिमित्त कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे तसेच यंदाची दिवाळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आली असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १०० कोटी लसींचे कवच आपल्या अवतीभवती उभे केले आहे. त्यामुळे आपण काही अंशी मोकळा श्वास घेऊ शकलो आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते नवीन पनवेल येथे दिवाळीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



नगरसेविका राजश्री महेंद्र वावेकर यांच्या माध्यमातून दिवाळीनिमित्ताने प्रभाग क्रमांक १६ येथील रहिवाशांसाठी रविवारी (दि. १) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कंदिल सजावट, रांगोळी, दिवा सजावट, गायन यांसारख्या विविध स्पर्धांचा समावेश होता. पनवेल शहर भाजप युवा मोर्चाचे सचिव आयुफ अकुला यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी बजावली. या कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती समीर ठाकूर, नगरसेवक विकास घरत, भाजप नेते महेंद्र वावेकर, युवा नेते हॅप्पी सिंग, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, शिवाजी भगत आदी उपस्थित होते.

नगरसेविका राजश्री वावेकर यांनी प्रभागातील रहिवाशांसाठी दिवाळीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याने व प्रभागातील उद्यानात पाणपोई सुरू केल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी राजश्री व महेंद्र वावेकर यांचे कौतुक केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या स्पर्धकांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छाही दिल्या.

या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, कोरोनाच्या काळात थांबलेले जीवनमान आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. त्यामुळे कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व नागरिकांच्या मनोरंजनासाठी अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक होते. भविष्यातील युग हे स्पर्धात्मक असून शिक्षणाच्या बरोबरीने अतिरिक्त कौशल्य असणेही गरजेचे आहे. यासाठी कलाकारांना वाव देण्याचे काम नगरसेविका वावेकर करीत असून त्यांनी खऱ्या अर्थाने प्रभागातील कलाकारांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे म्हणत परेश ठाकूर यांनी वावेकर यांच्या कार्याचे कौतुक केले.

## ब्राह्मण सभेचा दीपसंध्या कार्यक्रम

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



नवीन पनवेल येथील ब्राह्मण सभा या संस्थेचा संगीत व नृत्य या संकल्पनेवर आधारित दीपसंध्या हा कार्यक्रम नुकताच झाला. नवीन पनवेल येथील फडके विद्यालयाच्या पटवर्धन सभागृहात कोरोना सुरक्षेचे नियम पाळून हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला उद्योजक श्रीपाद खेर, सुबोध व शुभांगी भिडे, मीना कानिटकर या प्रमुख पाहुण्यांसह ब्राह्मण सभेच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. गेल्या वर्षभरात कोणतेही जाहीर सांस्कृतिक कार्यक्रम होऊ शकले नव्हते. त्यामुळे आजच्या कार्यक्रमामध्ये उत्साहाचे वातावरण होते.

सभेला संबोधित करताना श्रीपाद खेर म्हणाले, शॉर्टकट आणि झटपट पैसा ही निर्माण झालेली प्रवृत्ती नवीन पिढीसाठी घातक आहे. परिश्रम, जिद्द आणि विश्वास अंगी बाणवणे गरजेचे आहे. यासाठी देवावर श्रद्धा असावी. आपले जुने संस्कार जपताना नवीन विचारही आत्मसात करणे आवश्यक असल्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आपल्या फसवणूक अथवा नुकसानीची भीती मनातून काढून टाकून उद्योगाभिमुख होण्याचे आवाहन त्यांनी तरुण पिढीला केले.

या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही मान्यवरांच्या हस्ते झाला. त्यानंतर गायन, नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रम झाले. विजय मनोहर, श्रीकला जोशी व कश्मिरा देशपांडे यांनी गायन व नृत्यदिग्दर्शन केले. आभा वैद्य आणि वेधस अत्रे यांनी या कार्यक्रमाचे बहारदार निवेदन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

ब्राह्मण सभेचे पदाधिकारी, तसेच युवोन्मेष समूहाच्या सभासदांनी या कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन केले. या कार्यक्रमापूर्वी ब्राह्मण सभेची सन २०२०-२१ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.

## फसवणूक करणारा भोंदूबाबा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**


जुने आजार धार्मिक विधीद्वारे बरे करून देतो, असे सांगून महिला वर्गाकडून विधी व पूजा करण्याकरिता सोन्याच्या बांगड्या हातचलाखीने काढून घेऊन त्यानंतर त्या अदलाबदल करून दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या एका भोंदूबाबाला खारघर पोलिसांनी अटक केली.

खारघर वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका वृद्ध महिलेचा जुना आजार बरा करतो, असे सांगून एका भोंदू बाबाने त्यांच्या घरी जाऊन त्यांना धार्मिक विधीसाठी त्यांच्याकडे असलेल्या सोन्याच्या बांगड्या या बिछान्याखाली ठेवण्यास सांगितले व हातचलाखीने सदर बांगड्या काढून त्या ठिकाणी खोट्या बांगड्या ठेवल्या व एकूण एक लाख ६३ हजाराची फसवणूक करून तो पसार झाला. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली. पोलीस पथकाने या आरोपीचा वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेऊन अरफान खान (३१, रा. नेरूळ) याला अटक केली आहे. या अटकेमुळे अनेक फसवणुकीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## अल्पवयीन मुलींकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या महिलेला अटक

**पनवेल : वार्ताहर**

अल्पवयीन मुली व स्त्रियांकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या एका महिलेस कामोठे पोलिसांनी रंगेहाथ पकडून त्या ठिकाणाहून दोन अल्पवयीन मुली व तीन स्त्रियांची सुटका केली आहे.



कामोठे परिसरात अल्पवयीन मुली व स्त्रियांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन पैशांसाठी त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती वपोनि स्मिता जाधव यांना मिळताच त्यांनी एक बनावट ग्राहक व दोन पंचांच्या साथीने खाजगी वाहनाने कामोठे सेक्टर २० ऐश्वर्या हॉटेल येथे सापळा लावून हा व्यवसाय करणारी महिला वैभवी चव्हाण (४८) हिला ताब्यात घेतले.

या वेळी तिने वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या दोन अल्पवयीन मुलींची नावे, तसेच तीन महिलांसंदर्भात माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी या अल्पवयीन मुलींसह महिलांना ताब्यात घेतले आहे. या महिलेच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील अनेक गुप्तपणे चालणारे वेश्याव्यवसाय उघडकीस येणार आहेत.

## पोलीस अधिकारी असल्याचे सांगून महिलेचा विनयभंग

**पनवेल : वार्ताहर**

स्पा व्यवसाय चालविणाऱ्या महिलेकडे पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून तिच्याकडे खंडणीची मागणी करून न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन तिचा विनयभंग करणारा तोतया पोलीस अधिकारी इसमास खारघर पोलिसांकडून अटक करण्यात आली.

यातील आरोपी याने पोलीस अधिकारी असल्याचे सांगून तशी वेशभूषा करून तक्रारदार महिलेचे ब्युटी पार्लर व स्पाचे दुकान चालू ठेवण्याकरिता दरमहा २००० रुपये प्रमाणे रोख व गुगल पेद्वारे रक्कम स्वीकारून लॉकडाऊन काळात पैसे दिले नाहीत म्हणून महिलेस शिवीगाळी करून, जिवे मारून टाकण्याची धमकी देऊन तिच्याबरोबर अगोदर झालेल्या

**आरोपी गजाआड**



भेटीदरम्यान त्याने नकळत त्याच्या कारमध्ये सदर महिलेशी केलेले विनयभंगाचे कृत्य आरोपीने मोबाईलमध्ये रेकॉर्डिंग करून व्हिडीओ व्हॉट्सअॅपवर व्हायरल करण्याची धमकी दिली. या मोबदल्यात एक लाख रुपयाची मागणी करून ते न दिल्याने सदरचा व्हिडीओ व्हॉटसअॅपवर व्हायरल केल्याने याबाबतची तक्रार सदर महिलेने खारघर पोलीस ठाण्यात देताच पोलीस आयुक्त विपिन कुमार सिंह, सह. पोलीस आयुक्त जय जाधव, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहा पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर पोलीस ठाणेकडील वपोनि संदीपान शिंदे, मपोनि विमल बिडवे (गुन्हे), सपोनि मानसिंग पाटील, पोहवा वैद्य, पोना धनवटे, चौधरी, पाटील व पथकाने सदर आरोपीला तांत्रिक तपासाच्या आधारे पकडले. अटक आरोपी गुर्शिदप्पा अंबादास वाघमारे (वय ४७ वर्षे) विरोधात मुंबईतसुद्धा अशा प्रकारचे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हे असल्याची माहिती मिळाली आहे. या आरोपीच्या अटकेमुळे एकंदरीत आठ गुन्हे व अदखलपात्र १४ गुन्हे उघडकीस आले आहेत.



## दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

दोन अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन त्यांच्यावर शारीरिक अत्याचार करणाऱ्या दोन नराधमांना कामोठे पोलिसांनी गजाआड केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, हे आरोपी अल्पवयीन मुलींना घेवून भोसरी पुणे परिसरात लपले असल्याची माहिती मिळाली त्यानुसार अपहरण मुलींच्या आईंना घेवून कामोठे पोलीस ठाण्याचे विशेष पथक सलग दोन दिवस त्या ठिकाणी वास्तव्यास राहून मोठ्या शिताफीने आरोपी आर्यन दिलीप चौधरी (२३ रा.जुई गाव) व नेयाज अहमद हाशमी रा.भोसरी याला ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. या दोघांच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## उरण येथे महिला स्वयंसहायता गटांच्या उत्पादनांची प्रदर्शन, विक्री

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद अंतर्गत, प्रेरणा व शिवसंग्राम महिला ग्रामसंघ केगाव आयोजित उरण नगर परिषदेच्या सहकार्याने महिला स्वयंसहायता समूह आणि महिला व्यावसायिकांच्या उत्पादनाची जाहिरात आणि विक्री व्हावी हा उद्देश ठेवून दोनदिवसीय प्रदर्शन आणि विक्री मेळावा महिलांच्या उत्कर्षासाठी मेहनत घेणाऱ्या जयश्री रमाकांत पाटील, प्रज्ञा सुधीर पारधी आणि जाईली परेश तेरडे यांनी आयोजित केला होता.



उरण नगरपालिका शाळेचे नाना मराठी माध्यमिक शाळेचे मैदान येथे शनिवार (दि. ३०) आणि रविवार (दि. ३१) रोजी या भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले होते. यामध्ये विविध स्वयंसहायता गट आणि महिला व्यावसायिकांनी उत्साहाने भाग घेत दिवाळी फराळ, दिवाळी सजावट, कंदिल, पणत्या, क्रॉकरी, साड्या, ड्रेसेस, मोत्यांच्या वस्तू, पेंटिंग्ज, चॉकलेट्स, व्हेज नॉनव्हेज पदार्थ वगैरे एकूण ३३ स्टॉल्स ठेवले होते.

शनिवारी सकाळी नगराध्यक्ष सायली सविन म्हात्रे यांच्या हस्ते आणि नायब तहसीलदार आशा म्हात्रे, केगाव सरपंच नंदकुमार पाटील, सीमा घरत यांच्या उपस्थितीत उदघाटन झाले. संध्याकाळी महिलांसाठी होम मिनिस्टर हा लोकप्रिय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वेळी पूनम गणेश पाटेकर या शिक्षिका विजेत्या ठरल्या. त्यानंतर स्टेप आर्ट डान्स अॅकेडमीच्या विद्यार्थ्यांचा नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रविवारी आयोजकांतर्फे १००० रुपयाच्या वर खरेदी करणाऱ्या ग्रहकांसाठी लकी ड्रॉ काढण्यात आला. लकी ड्रॉ विजेत्या वैदेही वैभव कलंगुटकर यांनी पैठणी जिंकली, तसेच १०० रुपयाचे कूपन घेणाऱ्यांचा लकी ड्रॉ काढण्यात आला.

## सुरेश पोसतांडेल यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड

**उरण : वार्ताहर**

सुरेश पोसतांडेल यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली. सुरेश पोसतांडेल हे उरण नगर परिषद येथे लेखाधिकारी पदावर काम करीत आहेत. नगर परिषद, नगरपंचायत कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून करीत आहेत. त्यांची निवड झाल्याने नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

कर्तव्यदक्ष व प्रामाणिकपणे काम करणारे, स्वच्छ चारित्र्यसंपन्न म्हणून सर्वत्र सुरेश पोसतांडेल यांची ओळख असून सुरेश पोसतांडेल हे उरण नगर परिषद येथे लेखाधिकारी पदावर काम करीत आहेत. ते नगर परिषद, नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे काम करत असून त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची निवड महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी करण्यात आली आहे.

या वेळी प्रदेश उपाध्यक्षपदी प्रदीप रावनकर, सरचिटणीसपदी रामेश्वर वाघमारे व कोषाध्यक्ष अनिल पवार यांचीही नेमणूक झाली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे



महाराष्ट्रातील सर्व नगर परिषद व नगर पंचायतमधील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन होत आहे. अनेक जणांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून तर काही जणांनी त्यांना सोशल मीडियाद्वारे पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रंग रांगोळीचे...




**पनवेल : दिवाळीनिमित्त शहरातील ओरियन मॉलमध्ये कलाकार प्रियांका जठार, रमेश डुकरे, नवीन मोरे आणि राकेश केणी यांनी आकर्षक रांगोळी साकारली आहे. या रांगोळीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री कंगना राणावत आणि भारताला ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवून देणारा नीरज चोप्रा दिसत आहे.**

## मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत काळसेकर महाविद्यालयात लसीकरण मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-ए-इस्लाम या शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या पनवेलमधील अब्दुल रज्ज़ाक काळसेकर पॉलिटेक्निक महाविद्यालयात नुकतीच मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत कोविड लसीकरण मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली. या मोफत लसीकरण अभियानांतर्गत सुमारे १०० विद्यार्थी, कर्मचारी व सामान्य नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसीचे डोस देण्यात आले.




पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या अभियानात वैद्यकीय कर्मचारी डॉ. सरिता महाजन, संजीवनी चोरघे, कविता साळवे यांनी लसीकरण केले, तर काळसेकर पॉलिटेक्निकचे प्रशासकीय अधिकारी आमिर सिवानी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. फेहमिदा सय्यद, युसुफ मुल्ला आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी यामध्ये मोलाची भूमिका बजावली.

अंजुमन-ए-इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, जनरल सेक्रेटरी जी. ए. आर. शेख, एक्झिक्युटिव्ह चेअरमन बुरहान हारिस, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. अब्दुल रज़्ज़ाक होनुटगी आणि काळसेकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रो. रमझान खाटीक यांचे मोलाचे मार्गदर्शन या अभियानाला लाभले.

## ‘एनएमएमटी’ आणखी ८० विद्युत बस घेणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पालिकेने विद्युत इंधनावर चालणारी वाहने खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून प्रशासनासाठी चार वाहनांचा प्रस्ताव यापूर्वीच तयार करण्यात आला आहे. याशिवाय पालिकेच्या परिवहन सेवेत ८० विद्युत बस घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पालिकेने डिझेलवर चालणाऱ्या १८० बसगाड्यांचे सीएनजी बसमध्ये परिवर्तन केले आहे. ‘एनएमएमटी’च्या ताफ्यात सध्या ६०० बस आहेत. नवी मुंबई पालिकेने पहिले शासकीय विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन पामबीच मार्गावर उभारले आहे. त्यामुळे नवी मुंबईची वाटचाल विद्युत वाहनांच्या दिशेने सुरू आहे.

## संपादकीय

# शेवटाची सुरुवात

**अनिल देशमुख यांच्या बाबतीत ईडीसारख्या तपास यंत्रणेने कमालीचा संयम दाखवला असेच म्हणावे लागेल. तपास यंत्रणांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी देशमुख यांना पुरेसा वेळ देण्यात आला होता. न्यायालयानेसुद्धा त्यांना दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर पर्यायच न उरल्याने देशमुख यांना चौकशीसाठी उपस्थित व्हावे लागले. असे असतानाही त्यांना झालेली अटक अनैतिक किंवा बेकायदेशीर कशी असू शकते? प्रत्यक्षात देशमुख यांच्या अटकेमुळे सत्ताधाऱ्यांचा चांगलाच मुखभंग झाला असून तोंड लपवायची पाळी आली आहे ही खरी वस्तुस्थिती आहे.**

गेले अनेक महिने चालू असलेले महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठे नाट्य आता शेवटाकडे आले आहे. या नाटकाचा शेवट अपेक्षित होता तसाच तो होताना दिसत आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना अंमलबजावणी संचालनालय म्हणजेच ईडीने सोमवारी मध्यरात्री रीतसर अटक केली. अटकेपूर्वी अन्य सामान्य आरोपींप्रमाणेच त्यांची १३ तास कसून चौकशी करण्यात आली. सामान्य आरोपीप्रमाणेच त्यांना मंगळवारी सकाळी न्यायालयासमोर उभे करण्यात आले आणि १४ दिवसांच्या कोठडीची मागणी ईडीतर्फे करण्यात आली. हे सारे कधी ना कधी घडणार होतेच, परंतु ऐन दिवाळीच्या तोंडावर देशमुख कारागृहाच्या दारात जाऊन उभे राहतील, असे मात्र कोणासही वाटले नव्हते. कारण याच देशमुखांनी या आधी इडीने पाठवलेल्या समन्सना वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या. आलेल्या समन्सना एकदाही प्रतिसाद न देणारे देशमुख आणि त्यांचे वकील आजही ईडीला आम्ही संपूर्ण सहकार्य करतो आहोत असाच दावा करत आहेत. समन्सना उत्तर न देणे याला सहकार्य कसे म्हणायचे? सचिन वाझेप्रकरणी देशमुख यांना ना-ना प्रकारच्या चौकशांना तोंड द्यावे लागत आहे. १०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुली प्रकरणात त्यांच्यावर गंभीर आरोप आहेत. शिवाय गैरवाजवी संपत्तीच्या बाबतीतही अन्य तपास संस्थांनी त्यांच्या मागे ससेमिरा लावला आहे. महाविकास आघाडी सरकारचा गृहमंत्रीच जेलखान्यात बंद होतो याला महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणायचे की आणखी काही असे अनेकांना वाटेल. एवढे रामायण घडून गेल्यानंतरही महाविकास आघाडीचे नेते देशमुख यांची उघडपणे पाठराखण करीत आहेत याचेच आश्चर्य वाटते. देशमुख यांना या प्रकरणात हेतुपुरस्सर फसविण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया त्यांच्याच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी दिली आहे. मलिक यांच्या प्रतिक्रियेला आता फारशी किंमत उरलेली नाही. कारण ते स्वत:च भलत्याच प्रकरणात गळ्यापर्यंत अडकले आहेत. नैराश्यापोटी वारेमाप आरोपांची चिखलफेक करीत त्यांचे राजकारण चालू आहे. त्याची जबरदस्त किंमत महाराष्ट्राचे मतदार त्यांना मोजायला लावतीलच. शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी देशमुख यांची अटक बेकायदेशीर आणि अनैतिक असल्याचे म्हटले आहे. हे विधान त्यांनी कशाच्या जोरावर केले त्याचा शोध घ्यावा लागेल. वस्तुत: राज्याचा गृहमंत्रीच जेव्हा गुन्हेगारासारखा पोलिसांच्या गाडीत बसून आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहतो तो क्षण महाराष्ट्रासाठी भूषणावह म्हणता येणार नाही. याची चाड खरे तर सत्ताधारी नेत्यांनी बाळगायला हवी, मात्र नेमके या उलटच त्यांचे वर्तन दिसते आहे. या सरकारमधील वनमंत्री एका युवतीच्या मृत्यूप्रकरणी वादग्रस्त ठरतात आणि खुर्ची गमावून बसतात. गृहमंत्र्यांवर खंडणीचे आरोप आहेत. आणखी किमान दोन-चार मंत्री कारवाईसाठीच्या रांगेत आहेत. याला कुठल्या प्रकारचा कारभार म्हणायचा?



# सारी दुनिया का बोझ उठानेवाला कुली होणार स्टेशनवरून गायब

**सारी दुनिया का बोझ**
**हम उठाते है,**
**लोग आते है, लोग जाते है,**
**हम यही पे खडे रह जाते है.**

कुली चित्रपटात लाल डगला आणि हाताला बिल्ला लावून सुपरस्टार अमिताभ बच्चन यांनी केलेल्या कुलीच्या भूमिकेने रेल्वे स्टेशनवरील या कुलीला (स्टेशनसेवक) प्रतिष्ठा मिळवून दिली, पण आज रेल्वे स्टेशनवरील पायाभूत सुविधा आणि व्हिलवाल्या बॅगमुळे प्रवासी स्वावलंबी झाले आहेत. त्यामुळे पनवेल स्टेशनवरुन कुली हद्दपार झाला असून, लवकरच तो मुंबईच्या रेल्वे स्टेशनवरूनही हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे.

लाल डगला आणि हाताला बिल्ला लावलेला कुली हे प्रत्येक रेल्वे स्टेशनवर हमखास दिसणारे दृश्य. कुलीची लगबग सुरू झाली की गाडी येणार याची सूचना प्रवाशांना मिळत असते. गाडी फलाटावर येताच कुली लहान मुले आणि सामान असलेले किवा वृद्ध प्रवासी कोठे आहेत, हे पाहून तिकडे धाव घेणार. त्यांचे सामान टॅक्सी किंवा रिक्षापर्यंत नेणार. हो, कुली फक्त पुरुष असतात अशा भ्रमात राहू नका. मंजुदेवी ही पहिली महिला कुली राजस्थानच्या जयपूर स्टेशनला काम करीत होती. आपल्या पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी तिने पतीचा व्यवसाय करण्यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांकडे परवाना मागितला. सुरुवातीला विरोध झाला, पण नंतर तिला परवाना दिला. कुली हा रेल्वेचा कामगार नसून त्याला सेवा देऊन कमाई करण्यासाठी हा परवाना दिला जातो, पण आज हे दृश्य दुर्मिळ होत चालले आहे. कारण रेल्वे अधिकारी नवीन परवाने देत नाहीत. जे जुने परवानाधारक आहेत त्यांची संख्या अत्यंत थोडी असून आहेत ते आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनन्सवर काही वर्षापूर्वी एका अनधिकृत कुलीने रात्री उतरलेल्या एका तरुणीवर बलात्कार केल्याने आता अनधिकृत कुलींना स्टेशनच्या फलाटावर येण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

आज मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्स, दादर, बांद्रा आणि कुर्ला, तसेच ठाणे, कल्याण या महत्त्वाच्या स्टेशनवर कुलींची संख्या कमी आहे. जे आता आहेत ते पुढील दोन-तीन वर्षात निवृत्त होतील. पनवेल स्टेशनवर तर अधिकृत कुलीच नाही. प्रवाशांना स्टेशनवर कुली उपलब्ध होत नसल्याने आपले सामान स्वतःच घेऊन जावे लागते. या वेळी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल होतात.

पनवेल स्टेशनवरून रोज लाखो प्रवाशी येतात-जातात. त्यांना आपल्या बॅगांवर पिशव्या त्यावर लहान मुले अशी कसरत

**खबरबात**
**नितीन देशमुख**

करीत अरुंद आणि धोकादायक पुलावरून गाडी पकडायला जावे लागते. आशा वेळी एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची? याचा खुलासा रेल्वेचे अधिकारी करीत नाहीत.

खासदार पी. के. कृष्णदास यांच्या नेतृत्वाखालील रेल्वेची प्रवाशी सुविधा समिती महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आली होती. या समितीने बुधवारी (दि. २७) पनवेल स्टेशनवर पाहणी केली. प्रवासी संघटनेचे अध्यक्ष डॉ. भक्तीकुमार दवे यांनी पनवेल स्टेशनवर लिफ्टची सोय नाही, त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि रुग्णांना सामान घेऊन जिने चढून जाताना त्रास होतो. त्यातच कुली नसल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याकडे समितीचे लक्ष वेधले. पनवेलमध्ये २५-३० जण स्टेशन बाहेर कुलीचे काम करतात पण ते प्रवाशांचे सामान घेऊन फलाटापर्यंत येऊ शकत नाहीत, आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाते. या लोकांकडून वर्तणुकीचा पोलीस दाखला आणि फी घेऊन परवाना दिल्यास त्यांनाही रोजगार मिळेल. रेल्वेलाही महसूल मिळेल आणि प्रवाशांची सोय होईल. पण रेल्वेचे अधिकारी याला तयार नसल्याने आता फलाटावरील लाल डगला आणि हाताला बिल्ला लावलेला कुली हद्दपार होणार यात शंका नाही.





# कर्जतमधील आदिवासी वाड्यांमध्ये फराळाचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वारे ग्रामपंचायत हद्दीतील करकुल आणि विकासवाडी या दोन आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करून सम्यक ज्योती सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिवाळी साजरी केली.

करकुल आणि विकासवाडी या आदिवासी वाड्यांमध्ये एकूण ७० कुटुंबे आहेत. केवळ मोलमजुरीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो, मात्र या कोरोनाच्या काळात मजुरी मिळणेही मुश्किल झाल्याने या आदिवासींवर मोठं संकट आले आहे. अशा परिस्थितीत सम्यक ज्योती सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या दोन्ही वाड्यांमध्ये जाऊन दिवाळी फराळाचे वाटप केले. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ज्योती किरतकुडवे, सचिव आनंद पारगावकर, खजिनदार किरण किरतकुडवे, सहसचिव संजय साबळे, सदस्य सागर साबळे, सुभाष भवार, राजेश विचारे, आर्यन किरतकुडवे तसेच स्थानिक सुनील जाधव, सुकऱ्या मुकणे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# 'चाईल्ड लाईन'कडून कर्जतमध्ये जनजागृती

**कर्जत : बातमीदार**

दिशाकेंद्र संचालित रायगड चाइल्ड लाइन या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कर्जत शहरात चाइल्ड लाइनचे हक्क आणि अधिकार यांची माहिती देऊन जनजागृती केली.

बालकामगार ठेवणे हा गुन्हा आहे. याबाबत कर्जत शहरातील दुकानदार आणि हॉटेल मालकांना माहिती देऊन रायगड चाईल्ड लाईनच्या कार्यकर्त्यांनी जनजागृती केली, तसेच कोणत्याही समस्येमुळे अडचणीत आलेल्या लहान मुलांनी तत्काळ चाईल्ड लाईनच्या १०९८ या टोल फ्री नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

रायगड चाइल्ड लाइन हा केंद्र सरकारचा प्रकल्प असून या प्रकल्पात ० ते १८ वयोगटातील मुलांसंबंधित कार्य केले जाते. यामध्ये बालकामगार, एखादे अनाथ, एकटे आणि आजारी मुले, भरकटलेली मुले, लैंगिक शोषणास बळी पडलेली मुले आणि शिक्षणापासून वंचित मुले, कौटुंबिक कलहातून सापडलेली मुले अशा मुलांना रायगड चाईल्ड लाईनकडून सहाय्यता केली जाते, अशी माहिती संस्थेचे कार्यकर्ते जगदीश दगडे, अनिता जाधव, माधुरी कराले, विमल देशमुख, भगवती तांदले (सोनावणे) यांनी कर्जत शहरात फिरून दिली.

# बालउद्योजकांचा मेळा

मुलांना खरेदी-विक्रीचे व्यवहार समजतील, नफा-तोटा याचे आकलन होईल. गुंतवणूक, वस्तू बनवण्याची तयारी, पॅकिंग, मार्केटिंग या गोष्टी त्यांना समजतील या हेतूने पनवेलमध्ये बालक बाजार भरवण्यात आला होता. बालक बाजार ही कल्पना बच्चेकंपनीने उचलून धरली.

कोणती वस्तू विकायला ठेवायची, आपलं बजेट किती, त्यामध्ये पॅकिंग किती आणि कसे करायचे, या वस्तू कितीला विकायच्या असे प्रश्न सुरू झाले, मग त्याने अशा वस्तू होलसेल मिळत आहेत का? हे बघायला सुरुवात केली, कोणाकडून ऑर्डर देऊन बनवून घेता येते का? याची शोधमोहीम सुरू झाली. मुलांचे पुढचे प्रश्न... होलसेल म्हणजे काय? रिटेल म्हणजे काय? स्वतःलाच बनवलेल्या वस्तू विकायच्या की रेडीमेड आणायच्या... स्वानंदसारख्या मुलांनी पणत्या रंगवायला घेतल्या, श्रीने वारली पेंटिंग हातात घेतले, निहारिकाच्या आईने सांगितले तुझ्या वस्तू तू बनवायच्या, आम्ही पैसे देणार नाही, खाऊच्या पैशातून कागद, फेविकॉल असं सामान तिने विकत आणलं आणि घरीच आकशकंदिल बनवले. यू ट्यूबच्या साह्याने पणत्या होल्डर बनवले. एका मुलांने एकच वस्तू विकायची असे ठरवल्यामुळे मुलाने अनेक पर्याय शोधले आणि आपापल्या आयांना ते शोधायला लावले. मृण्मयी आणि कौस्तुभ यांच्या आया पर्स, मास्क, केसांचे बो अशा वस्तू पहिल्यापासूनच बनवत होत्या. बालक बाजारसाठी मुलांनी अशा वस्तू आवर्जून आयांना बनवायला सांगितल्या. सर्वेशनेही रांगोळी होलसेल बाजारात कुठे मिळते? कुठले कलर घ्यायचे? किती किलो रांगोळी घेतल्यावर किती पाकीट तयार होतील.

बाजारात दहा रुपयांना किती रांगोळी मिळते? आपण जे पॅकिंग केले ते बाहेरच्या तुलनेत योग्य आहे का? याचा अभ्यास सुरू केला. बाजारातून रांगोळी आणली. त्याचे पॅकिंग स्वतःच केलं, चांगल्या दर्जाचे उटणे कुठे मिळते? यासाठी त्यांनी मला अनेक ठिकाणी फोन करायला लावले, त्यातले कुठले उटणं विकलं जाईल यासाठी तो सतत घरी सगळ्यांना विचारू लागला. सानवी आणि निहार यांनीसुद्धा फराळाचे पदार्थ कुठले सांगायचे ? किती ग्रॅमचे पाकीट बनवायचे ? आणि किती किंमत लावायची ? यासाठी शोध मोहीम राबवली.कुशल नावाप्रमाणेच कुशल होता, त्याने आईला चिरोटे बनवताना वेगळं काही करता येईल का ? यासाठी आग्रह धरला. मग आईनेही चिरोटेमध्ये विविधता ठेवली, जिरा चिरोटे, गुलाब चिरोटे अशी नावं त्यांना दिली आणि हे सगळे छोटे बिझनेस मॅन कामाला लागले.

बाजार आणि बाजारासाठी विकल्या जाणाऱ्या वस्तू यांना आकार प्राप्त होऊ लागला. या दरम्यान मुलांची बैठक आम्ही घेतली. बालक बाजारच्या अनुषंगाने काय काय हवे आहे आणि काय गरज आहेत, यासाठी मुलांना बोलतं केलं, मुलांनी केवढा विचार करून ठेवला होता. आम्हाला मास्क, सॅनिटायझर हवं, वही-पेन हवी, कोणते टेबल मिळेल ? पैसे ठेवायला बॉक्स हवा, अशा एक ना अनेक सूचना त्यांनी केल्या. मग आम्ही पण त्याला सुचवले, तुमच्या स्टॉलला तुम्हाला आवडेल, ते नाव द्या. बालक बाजारामध्ये येणाऱ्या, मुलांना प्रेरणा मिळेल, अशा अनुषंगाने ब्रीद वाक्य बनवा. हे मुलांनाही आवडले. आपल्या स्टॉलला काय नाव द्यायचे ? यासाठी विचारविमर्श सुरू झाला, स्वानंदने ओजस नाव निवडले, सर्वेश ने सर्वांकुर रांगोळी स्टॉल, सानवी आणि निहार या दोघांनी मिळून एस. एन. फुड स्टॉल, असे नाव शोधले. प्रत्येकानेच आपापल्या नावांचा आधार आपल्या स्टॉलला दिला. किमया आणि कृष्णा या दोघी लॉकडाऊनमध्ये चॉकलेट बनवायला शिकल्या होत्या. त्यांनी रेडिमेड चॉकलेटचा कृष्णा चॉकलेट्स नावाने स्टॉल लावला.

बालक बाजारचा दिवस उजाडला. दिलेल्या वेळेच्या आधीच ही बाल उद्योजक मंडळी जाग्यावर हजर झाली. स्टॉल सजवणे, स्टॉलचे नाव लावणे, वस्तू आकर्षक रित्या मांडून ठेवणे यासाठी त्यांची धांदल सुरू झाली. गरज भासली तरच आईने मदत करायची असे ठरले होते.

बालक बाजारबाबत सगळ्यांच्याच मनामध्ये कुतूहल आणि उत्सुकता होती. प्रत्येकाने आपापल्या संबंधित व्हॉट्सअॅप ग्रुपवर त्याविषयी प्रसिद्धी केली होती. हळूहळू कस्टमर यायला लागले. कौतुकाने मुलांना वेगवेगळे प्रश्नही विचारू लागले. आपल्या स्टोअरजवळ कस्टमर आल्यानंतर उभे राहणं, त्यांना नमस्कार करणं, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देणं, या प्रत्येक गोष्टीचा सराव मुलांनी केला होता. हे त्या ठिकाणी जाणवलं. काही मुलं तर आमची ही वस्तू चांगली आहे. तुम्ही घेऊन बघा. तुम्ही पाच वस्तू घेतल्या की, त्यावर दुसरी वस्तू फ्री मिळेल असं सांगत होती. विकल्या गेलेल्या वस्तूंच्या नोंदी ठेवणे, नोटा आणि सुटे पैसे वेगवेगळ्या ठेवणे, समोरच्या वस्तू संपल्या असतील, तर त्या जागी दुसऱ्या वस्तू व्यवस्थित मांडल्या जातील याकडे अतिशय काटेकोरपणे या मुलांचं लक्ष होतं. खरंतर एका जागेवर सलग दोन-तीन तास बसणं हे या बाळगोपाळांना एरवी शक्यच नसतं. यावेळी मात्र तीन ते चार तास ही मुलं अखंडपणे एका जागेला उभी होती. बहुतांशी मुलांच्या बऱ्यापैकी वस्तू कस्टमर किंवा पालकांनी विकत घेतल्या होत्या. त्यामुळे सगळे बाल उद्योजक अगदी खुश होते.



बाजार संपल्यानंतर मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आपल्या किती वस्तू विकल्या गेल्या आणि आपल्याला किती फायदा झाला याचं गणित या मुलांनी तेव्हाच मांडलं होतं. व्यवसायात आपल्याला फायदा झाला, म्हणून ही मंडळी धमाल मस्ती करत होती. या बालक बाजारनंतर पुढचे चार आठ दिवससुद्धा सगळे गणितमय होऊन गेले होते. म्हणजे प्रत्येक गोष्टीत मुलांना आता हिशोब कळायला लागला. आईबरोबर बाजारात गेल्यानंतर जमाखर्चाचा हिशोब ही मंडळी खूप चांगल्या पद्धतीने बघू लागली. एकूणच बाल उद्योजकांचा हा मेळा खऱ्या अर्थाने यशस्वी झाला. जी बाल मंडळी वस्तू विकत घ्यायला आली होती, ज्यांना स्टॉल उभे करणे शक्य झाले नव्हते अशा मुलांनी ही घरी जाऊन घरातल्या वस्तूंचा चक्क बाजार मांडला आणि वस्तू आई-बाबांना विकत घ्यायला भाग पाडल्या.

**-अपर्णा नाडगौंडी, पनवेल**

# मुरूडमधील आपद्ग्रस्तांना शासकीय मदत द्या

## सरपंच मनीष नांदगावकर यांची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

तौत्के चक्रीवादळ व अतिवृष्टीमुळे मुरूड तालुक्यातील मच्छीमार, शेतकरी व स्थानिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यापैकी अनेकांना शासकीय मदत येऊनसुद्धा ती मिळालेली नाही. या प्रकरणाची चौकशी करून येथील आपद्ग्रस्तांना तातडीने मदत करावी, अशी मागणी उसरोली ग्रामपंचायतीचे सरपंच मनीष नांदगावकर यांनी उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.




(छाया : संजय करडे)

तौत्के चक्रीवादळ व महापुरात मुरूड तालुक्यातील अदाड, खारीकवाडा, खारदौडकुले, वाळवंटी, उसरोली, मजगाव नांदगाव, बोर्ली आदि गावांतील मालमत्ता व शेतीचे मोठे नुकसान झाले होते. तसेच कोर्लई, बोर्ली, मजगाव, मुरुड राजपुरी, नांदगाव या भागातील मच्छिमार होड्यांचे नुकसान झाले होते. या नुकसानीचे पंचनामेसुद्धा करण्यात आले होते. शासकीय मदत प्राप्त होवूनसुद्धा अनेक आपद्ग्रस्तांना पैसे मिळाले नाहीत. नुकसान भरपाईचे पैसे गेले कुठे याची चौकशी करावी, असे नांदगावकर यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**तालुक्यातील अतिवृष्टी आणि वादळग्रस्तांना तहसील कार्यालयाकडून नुकसानभरपाईचे वाटप करण्यात आले आहे. शेती, तसेच जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान या हेडखाली पैसे उपलब्ध झाले होते, त्यांचेही वाटप झाले आहे. एखाद्याला नुकसानभरपाईचे पैसे मिळाले नसतील, तर त्याची माहिती द्यावी, त्याला त्वरित नुकसानभरपाई देण्यात येईल.**

**-रवींद्र सानप, नायब तहसीलदार, मुरूड**

# नियम पाळा; अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## माथेरान पोलिसांचा अश्वचालकांना इशारा


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

पर्यटकांना चुकीच्या पद्धतीने माहिती पुरविणे, अवाजवी दर आकारणे, विनापरवाना घोडे चालविणे, तसेच नियमांचे पालन न केल्यास कारवाई अटळ असल्याचा इशारा माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संजय बांगर यांनी येथील अश्वचालकांना दिला.

कोरोनाचे निर्बंध शिथिल होताच पर्यटकांची पावले माथेरानकडे वळू लागली असून, दिवाळीच्या सुट्टीत मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून स्थानिक प्रशासनाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषदेसह पोलीस प्रशासनाने स्थानिक अश्वपालकांना भेडसाविणाऱ्या समस्या जाणून घेतल्या.

माथेरानमध्ये जुन्या परवाने बिल्ल्यांवर राजरोसपणे घोडे चालविणाऱ्या अश्वचालकांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच फसवणूक थांबविण्यासाठी पर्यटकांना शहरातील अहिल्याबाई होळकर चौक ते वखारी नाका हा भाग वगळून अन्य ठिकाणी मुभा मिळावी, अशी मागणी अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशा कदम यांनी या वेळी केली. अश्वपालकांना परवडणारे दर निश्चित करण्याची विनंती लहू शिंगाडे यांनी केली. अश्वचालक म्हणून अल्पवयीन मुलांचा होणारा वापर तत्काळ थांबविण्यात यावा, तसेच उताराच्या ठिकाणी प्लेवर ब्लॉक ऐवजी अन्य पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी अश्वपालक संघटनेचे सचिन पाटील यांनी केली.

पर्यटकांना घोडे सवारीची प्रिपेड सेवा देण्याकरिता लवकरच केबिन व्यवस्था करण्यात येईल तसेच प्रेक्षणीय स्थळांवर २०१३ सालचे शासकीय दरपत्रक लावण्याचे आश्वासन नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी दिले.

माथेरानमध्ये ४६० घोड्यांना परवाना असल्याने तितकेच घोडे दिसले पाहिजेत. प्रत्येक पॉइंटवर पर्यटकांना उतरवणे बंधनकारक राहील. दस्तुरी नाक्यावर नियमानुसार फक्त पाचच अश्वपालकांनी गणवेशात उपस्थित रहावे, अशा सूचना सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी केल्या. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, स्थानिक अश्वपाल संघटना व मुळवासीय अश्वपाल संघटनेचे कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पर्यटकांची दिशाभूल, तसेच त्यांच्याकडून जास्त दर आकारणी केल्यास आणि चुकीच्या पद्धतीने माहिती पुरवल्यास फसवणुकीचा गुन्हा दाखल करून सदर घोडेचालकाचा परवाना रद्द करण्यात येईल.**

**–संजय बांगर, सहाय्यक निरीक्षक, माथेरान पोलीस ठाणे**

## भाजप कामगार मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीसपदी पालीतील राजेंद्र गांधी यांची नियुक्ती

**पाली : प्रतिनिधी**

भाजप कामगार मोर्चाच्या दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीसपदी सुधागड पाली येथील ज्येष्ठ सक्रिय कार्यकर्ते राजेंद्र महादेव तथा भाऊ गांधी यांची, तर सुधागड तालुका अध्यक्षपदी रवींद्र खैरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना भाजप कामगार मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र सन्मानपूर्वक देण्यात आले.

राजेंद्र गांधी हे सुधागड तालुका भाजपचे माजी अध्यक्ष असून विधायक व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याबरोबरच जनतेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी ते कायम पुढे असतात. त्यांची कामगार मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस पदाची नियुक्ती करण्यात आली आहे, तर कामगार मोर्चाच्या सुधागड तालुका अध्यक्षपदी रवींद्र खैरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.


(छाया : धम्मशील सावंत)

## सोशल मीडियावर आक्षेपजनक पोस्ट; खोपोलीत तणाव


(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

भारत–पाकिस्तान क्रिकेट मॅचमध्ये पाकिस्तान जिंकल्याच्या संदर्भात सोशल मीडियावर खालापूर तालुक्यातील एका तरुणाने आक्षेपजनक पोस्ट टाकली. ती पोस्ट झपाट्याने वायरल झाल्यानंतर खोपोलीमध्ये याबाबत तणाव निर्माण झाला. या पोस्टला आक्षेप घेत मंगळवारी (दि. २) सकाळी खोपोली पोलीस ठाण्यावर अनेक तरुणांनी धडक देत, संबंधित तरुणावर गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली.

दरम्यान, संबंधित तरुण खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने, खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी तरुणांच्या शिष्टमंडळाला खालापूर पोलीस ठाण्यात जाण्याविषयी सांगितले. मात्र तरीही बराच काळ तरुणांनी खोपोली पोलीस ठाण्याबाहेर गर्दी केली होती. खोपोली पोलीस तक्रार घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचा संताप अनेकांनी व्यक्त केला. मात्र खोपोली पोलीस ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर तरुणांनी खालापूर पोलीस ठाणे गाठत संबंधित तरुणावर गुन्हा दाखल करण्याचे निवेदन दिले.

यासंदर्भात खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अनिल विभुते यांच्याशी संपर्क केला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. या तक्रारीबाबत पोलिसांनी काय भूमिका घेतली हे उशिरापर्यंत कळू शकले नाही.

## पेणमधील पोलीस वसाहतीची दैनावस्था

### नवनिर्मिती अडकली लालफितीत


(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

येथील पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वसाहतींची दयनीय अवस्था झाली असून, काही इमारती धोकादायक झाल्या आहेत. पर्यायी व्यवस्था नसल्याने काही पोलीस कर्मचाऱ्यांना या इमारतीत जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे. तर काही कर्मचारी जीवाच्या भीतीने भाड्याच्या घरात राहत आहेत.

पेण तालुक्यात पोलीस अधिकाऱ्यांसह सुमारे १२८ कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये पेण पोलीस ठाण्यात अंदाजे चार अधिकारी ५७ कर्मचारी, वडखळ पोलीस ठाण्यात तीन अधिकारी ३८ कर्मचारी आणि दादर पोलीस ठाण्यात दोन अधिकारी २४ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना कुटुंबासह राहण्यासाठी असलेल्या वसाहतीमध्ये पाच मोठ्या इमारती आणि दोन बैठ्या चाळी आहेत. त्या अतिशय जीर्ण झाल्या आहेत. या पाचपैकी फक्त एका इमारतीमध्ये कर्मचारी जीव मुठीत घेऊन राहत आहेत.

कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या पोलिसांना आपल्या कुटुंबासमवेत राहण्यासाठी सुसज्ज वसाहत लवकरात लवकर बांधण्यात यावी, अशी मागणी वारंवार सामाजिक कार्यकर्ते हरीष बेकावडे यांनी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे.

**पोलीस कर्मचारी वसाहतीमधील इमारतींची तपासणी सुरू आहे. त्याचा अहवाल लवकरच पूर्ण होईल. याबाबत वरिष्ठांसह पेण पोलीस ठाण्यातूनही पत्रव्यवहार झाला आहे. लवकरच पोलीस वसाहतीमध्ये नव्या इमारती बांधण्यात येतील.**

**–निरीक्षक देवेंद्र पोळ, निरीक्षक, पेण पोलीस ठाणे**

# वंचितांना अधिकार मिळवून देण्यासाठी जागृती आवश्यक -वरिष्ठ न्यायमूर्ती ए. ए. सय्यद

## नागोठणे येथे विधी सेवा महाशिबिर



**अलिबाग : जिमाका**

संविधानाने सर्वांना समान हक्क दिले आहेत. तरीही समाजात अजूनही मागासलेले, वंचित घटक आहेत. त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी जागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती तथा राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष ए. ए. सय्यद यांनी सोमवारी (दि. १) नागोठणे येथे केले.

विधी सेवा प्राधिकरण, आणि रायगड जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नागोठणे येथील रिलायन्स टाउनशिपमधील बालगंधर्व रंगभवन सभागृहात सोमवारी विधी सेवा महाशिबिर व शासकीय सेवा, योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी न्या. सय्यद बोलत होते. देशहितासाठी समाजातील सर्वच स्तरांची सर्वांगीण प्रगती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव न्या. दिनेश सुराणा यांनी केले. सर्व मार्गांनी शेवटच्या माणसापर्यंत त्यांचे हक्क मिळवून द्यायचे ध्येय्य विधी सेवा प्राधिकरणाने ठरविले असून, वंचितांना त्यांचे हक्क, कर्तव्य व जबाबदारी यांची जाणीव जागृती होण्यासाठी या उपक्रमाद्वारे प्रयत्न केले जात आहेत, असे प्रतिपादन रायगड जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे यांनी केले.

रायगड जिल्ह्यात येत्या काळातही लोकाभिमुख, पारदर्शी, जनतेला हितकारक असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिवाणी न्यायाधीश ए. एम. मुजावर आणि दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) एस. आर. पाटील यांनी केले. राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे न्या. अशोककुमार भिलारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा सरकारी वकील भूषण साळवी यांच्यासह सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, विविध शासकीय विभागांचे कार्यालय प्रमुख, तालुका बार कौन्सिलचे अध्यक्ष, वकील, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

माझी वसुंधरा या अभियानाच्या जनजागृतीबाबतच्या घडीपत्रिकांचे प्रकाशनही या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध तालुक्यातून आलेल्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विविध शासकीय दाखले व लाभ देण्यात आले. विशेष बाब म्हणजे दिव्यांग लाभार्थ्यांना लाभाचे प्रमाणपत्र देण्यासाठी न्या. ए. ए. सय्यद स्वतः व्यासपीठावरून खाली आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. संदीप स्वामी यांनी आभार मानले.

## रोह्यात आदिवासी मुलांना भेटवस्तूंचे वाटप

**रोहा :** एम. बी. मोरे फाऊंडेशनच्या धाटाव येथील महिला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना समिती व स्नेहवर्धिनी सोशल ट्रस्ट–वरसे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ३०) दिवाळी सणानिमित्त पाले खुर्द (ता. रोहा) येथील आदिवासीवाडीमधील मुलांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. स्नेहवर्धिनी ट्रस्टच्या कर्मचारी सुप्रिया झोलगे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर, प्रा. प्रतीक्षा घारगे, प्रा. हेमलता पाटील, प्रा. प्रतिमा भोईर यांच्यासह १८ विद्यार्थिनी या वेळी उपस्थित होत्या.


**Neel's Lake View Co-Op. Hsg. Soc. Ltd.**

Reg. No.: NBOM / CIDCO / HSG / OH / 2410 / JTR / 2006 - 2007

Plot No.20, Sector -06, Khanda Colony, New Panvel (W), Dist. Raigad, Navi Mumbai 410 206

Date : 03/11/ 2021

या संस्थेचा सन २०२१–२२ ते २०२५–२६ साला करीताचा निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे

| अ.क. | निवडणूक कार्यक्रम तपशिल | एकूण दिवस | कालावधी, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यकम व प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्दी करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | १ | दिनांक :–०३/११/२०२१<br>वेळ: सकाळी ११.३० वा.<br>ठिकाण :– संस्थेचे कार्यालय |
| २ | प्रारुप (कच्ची) मतदार यादीवरील आक्षेप स्विकारण्याची तारीख व वेळ | ५ | दिनांक:–०३/११/२०२१ ते ०९/११/२०२१<br>(सुटीचे दिवस वगळून)<br>वेळ:– सकाळी ११.३० ते दुपारी ०१.०० वा.<br>ठिकाण:– संस्थेचे कार्यालय |
| ३ | प्रारूप (कच्ची) मतदार यादीवरील आक्षेप निकाली काढण्याची करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | २ | दिनांक:– १०/११/२०२१ ते ११/११/२०२१<br>वेळ: सकाळी ११.३० वा.<br>ठिकाण:–संस्थेचे कार्यालय |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | १ | दिनांक:– १२/११/२०२१<br>वेळ:– सकाळी ११.३० वा. ठिकाण:–संस्थेचे कार्यालय |
| ५ | नामनिर्देशन पत्र (मेदवारी अर्ज) देण्याची व दाखल करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | ५ | दिनांक :–१३/११/२०२१ ते १७/११/२०२१<br>(सुट्टीचे दिवस वगळुन)<br>वेळ :– सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वा.<br>ठिकाण:– संस्थेचे कार्यालय |
| ६ | प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची (उमेदवारी अर्ज) प्रसिध्दी करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | १ | दिनांक :–१७/११/२०२१<br>वेळ–दुपारी २.३० वा. ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| ७ | नामनिर्देशन पत्राच्या (उमेदवारी अर्ज) छाननी करण्याची तारीख वेळ व ठिकाण | १ | दिनांक :– १८/११/२०२१<br>वेळ–सकाळी ११.३० वा. ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| ८ | नामनिर्देशन पत्राच्या (उमेदवारी अर्ज) छाननी केल्यानंतर वैध नामनिर्देशनाची यादी (उमेदवार यादी) प्रसिध्द करण्याची तारीख वेळ व ठिकाण | १ | दिनांक:–१९/११/२०२१<br>वेळ– सकाळी ११.३० वा. पासुन संपेपर्यंत<br>ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| ९ | नामनिर्देशन पत्र (उमेदवारी) अर्ज मागे घेण्याची तारीख, वेळ व ठिकाण | १५ | दिनांक:–२०/११/२०२१ ते ०४/१२/२०२१<br>(सुट्टीचे दिवस वगळुन)<br>वेळ–सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वा.<br>ठिकाण–संस्था कार्यालय |
| १० | निवडणुक लढविण्याऱ्या उमेदवारांची अंतिम यादी निवडणूक चिन्हासह प्रसिध्द करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | १ | दिनांक :–०५/१२/२०२१<br>वेळ–सकाळी ११.३० वा. ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| ११ | मतदान घेण्यात येईल ती तारीख, वेळ व ठिकाण | ७ | दिनांक :–१२/१२/२०२१<br>वेळ–सकाळी ०९.०० ते दुपारी ०३.०० वा.<br>ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| १२ | मतमोजणीची तारीख, वेळ व ठिकाण | | दिनांक :–१२/१२/२०२१<br>वेळ–दुपारी ०४.३० वा. ठिकाण–संस्थेचे कार्यालय |
| १३ | मतदानाचा निकाल घोषित करण्याची तारीख, वेळ व ठिकाण | | दिनांक :– १२/१२/२०२१<br>वेळ–मतमोजणी संपल्यानंतर लगेच<br>ठिकाण:–संस्थेचे कार्यालय |

**ठिकाण :– खांदा कॉलनी, नवीन पनवेल.**
**दिनांक ०३/११/२०२१**

शिक्का

**सही/–**
**श्री. अमोल दि. गावडे**
**निवडणूक निर्णय अधिकारी/प्रधिकृत अधिकारी**
**मा. राज्य सहकारी निवडणू कप्राधिकरण यांच्या वतीने**
**निल लेक व्ह्यू को.ऑप. हौसिंग सोसायटी लि,**
**खांदा कॉलनी, पनवेल ४१० २०६**


## दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवाळीच्या खरेदीसाठी ग्राहकांनी मंगळवारी (दि. २) बाजारपेठेत गर्दी केली होती. रेडिमेड कपडे, दागिने, दुचाकी, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, मोबाइल, लॅपटॉप, एलईडी, घरखरेदी, गृहपयोगी वस्तू यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. शिवाय पूजेसाठी लागणारी फुले, आकाशकंदिल, फटाके, रांगोळी, मिठाई, फराळ आदी खरेदीची बाजारपेठेत लगबग दिसत होती. कोरोनामुळे शांत असलेली अलिबागची बाजारपेठ या निमित्ताने गजबजली आहे.

**ग्राहकांवर ऑफर्सचा वर्षाव**

दिवाळी सणानिमित्त ग्राहकांना मनसोक्त खरेदी करता यावी, यासाठी जिल्ह्यातील सर्वच प्रमुख बाजारपेठा पंधरा दिवसांपासून सजल्या आहेत. दिवाळीनिमित्त खास सवलत, मोफत भेटवस्तू तसेच फायनान्स ऑफर्स देवू केल्या आहेत. ग्राहकही या ऑफर्सचा पुरेपूर लाभ घेत आहेत.

दिवाळीनंतर येणाऱ्या लग्नसराईसाठीदेखील आता खरेदी होत आहे. त्यामुळे कपडा मार्केटही तेजीत आहे. नवनव्या फॅशनच्या कपड्यांनी दुकाने सजली आहेत. तयार कपड्यांवर विशेष ऑफर्स दिल्या आहेत. कापड दुकानांमध्ये साडी खरेदीसाठी महिलावर्गाची विशेष गर्दी दिसत आहे.

दिवाळीच्या मुहूर्तावर टीव्ही, फ्रीज, वातानुकूलित यंत्र, ओव्हन, सीडी, एलसीडी, संगणक यासारख्या वस्तू खरेदीला प्राधान्य दिले जाते. वाहनांची आगाऊ नोंदणी मोठ्या संख्येने होत आहे. कागदपत्रांची पूर्तता करून ती तसेच वस्तू पाडव्याच्या मुहूर्तावर घरी नेण्याचे अनेकांनी नियोजन केले आहे. मोबाइलसह इलेक्ट्रॉनिक उत्पादनांसाठी झिरो डाउन पेमेंट, ईएमआय, शून्य टक्के व्याजासह कर्ज आदी सुविधाही देण्यात आल्या आहेत. खास डिस्काउंटसह नवेनवे फिचर असलेले फोन दिवाळीनिमित्त लाँच केले आहेत. लॅपटॉप, वॉशिंग मशिन, अँड्राइड आणि स्मार्ट टीव्ही, ओव्हन, मिक्सर, आदी गृहोपयोगी वस्तू खरेदीला पसंती दिली जात आहे.

मिठाई, ड्रायफ्रुटस तसेच तयार फराळ खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. रस्त्यांवर लावलेल्या स्टॉलवर आकाशकंदिल, रांगोळी, फुले, पणत्या, फटाके आदी वस्तूंच्या खरेदीसाठी रात्री उशिरापर्यंत ग्राहकांची वर्दळ होती.

## कर्जतमध्ये लसीकरण, मास्कविषयी जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे मुंबई या संस्थेमार्फत कर्जत शहरातील आमराई रिक्षा स्टँड येथे कोरोना लसीकरण व मास्क लावण्याचे फायदे काय होऊ शकतात, याविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

युनायटेड वे मुंबईच्या रेखा जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व लसीकरणाचे फायदे आणि काळजी कशी घ्यावी हे पटवून दिले. कर्जत पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी आपल्या भाषणात सगळ्या चालकांनी काय उपाय योजना केल्या पाहिजेत व आपली व आपल्या सोबत असणाऱ्या प्रवाशांची कशी काळजी घेतली पाहिजे या विषयी माहिती दिली. संस्थेचे खंडू मंजुळे, अपेक्षा देशमुख, पोलीस हवालदार प्रशांत देशमुख, पोलीस शिपाई भरत पावरा यांच्यासह कर्जत आमराई रिक्षा स्टँडचे अध्यक्ष व सर्व रिक्षा चालक, मालक या वेळी उपस्थित होते.


(छाया : विजय मांडे)

**आजचे सामने वर्ल्डकपचा थरार**


**द. आफ्रिका वि. बांगलादेश** (दुपारी ३.३० वा., दुबई)
**भारत वि. अफगाणिस्तान** (रात्री ७.३० वा., आबुधाबी)

# टीम इंडियाचा सामना आज अफगाणिस्तानशी

**सुपर-१२ लढत**

**आबुधाबी : वृत्तसंस्था**

सलग दोन पराभव पत्करलेल्या भारतीय संघाचा टी-२० विश्वचषकातील सुपर-१२मधील पुढील सामना बुधवारी (दि. ३) अफगाणिस्तानविरुद्ध आहे. त्यामुळे भारत हा सामना जिंकून विजयाचे खाते खोलण्यास उत्सुक असेल. वर्ल्डकपमध्ये भारताचा समावेश दुसऱ्या गटात आहे. या गटातून पाकिस्तानचे उपांत्य फेरीतील स्थान निश्चित असून पाचव्या स्थानावरील भारताची निव्वळ धावगती फारच खालावलेली आहे. त्यामुळे भारताने अफगाणिस्तान, स्कॉटलंड, नामिबिया या संघांविरुद्धचे सामने मोठ्या फरकाने जिंकणे गरजेचे आहे. शिवाय अन्य संघांच्या विजय-



पराजयावरही भारताचे उपांत्य फेरीचे आव्हान अवलंबून आहे. हे म्हणजे जर-तरसारखे आहे. संघनिवड हा विषय भारतासाठी डोकेदुखी ठरला आहे. आयपीएलमधील कामगिरीचा आणि खेळाडूंच्या पूर्ण तंदुरुस्तीचा आढावा न घेता राष्ट्रीय निवड समितीने संघ जाहीर केला. वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारला सातत्याने दुखापतींनी भेडसावले असून त्याची कामगिरीसुद्धा निराशाजनक आहे. ट्वेन्टी-२०मधील भारताचा सर्वोत्तम लेगस्पिनर यजुर्वेंद्र चहलऐवजी राहुल चहरला दिलेले प्राधान्य आणि आयसीसी स्पर्धांमध्ये हमखास चमकणारा सलामीवीर शिखर धवनऐवजी युवा इशान किशनवर दर्शवलेला विश्वास, असे काही मुद्देसुद्धा चर्चेचा विषय ठरत आहेत.

## चला धावूया आरोग्य जागरूकतेसाठी!

# कामोठ्यात बालदिनी फन रन

**लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यातील छाबा फाऊंडेशनच्या वतीने १४ नोव्हेंबर रोजी ५ आणि १० किलोमीटर पल्ल्याच्या धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. शारीरिकदृष्ट्या सक्षम समाज निर्माण करणे आणि वंचित मुलांच्या प्रगतीसाठी त्यांना पोषक अन्न आणि दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने या रनचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोना महामारीमुळे संपूर्ण देशभर लॉकडाऊन अर्थात टाळेबंदी जाहीर करण्यात आली होती. या कालावधीत सर्वांनाच घरात अडकून राहावे लागले. या दरम्यान चांगल्या आरोग्याचे आणि निरोगी शरीराचे महत्त्व सर्वांना कळले. या पार्श्वभूमीवर कामोठ्यात फन रन होत आहे. कामोठे सेक्टर ६ मधील रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानात येत्या १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता या स्पर्धेची सुरुवात होणार असून याच ठिकाणी सकाळी ८.३० वाजता बक्षीस वितरण समारंभ होई. या वेळी सुमारे ५० एचआयव्ही पॉझिटिव्ह बालकांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

स्पर्धा १८ ते ३०, ३० ते ४५, ४५ ते ६० आणि ६० वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील पुरुष व महिलांसाठी आहे. सहभागासाठी इच्छुकांनी https://www.townscript.com/e/kamothe-10km-5km-run-for-health-awareness-202423 या लिंकद्वारे स्वतःची नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी शेखर जगताप (९१६७०४८४५४), सचिन तांबोळी (७५०६७५०३११), राहुल जैस्वाल (९१७२४१५१४४), दामोदर चव्हाण (९६१९४५२४४७) यांच्याशी संपर्क करावा. स्पर्धेत टी-शर्ट, नाश्ता, टाइमिंग चिप, पदक, ई-प्रमाणपत्र आणि विजेत्यांसाठी ट्रॉफी देण्यात येणार आहे.






या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, दिलीप पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, युवा नेते हॅप्पी सिंग यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# इंग्लंडचा विजयी 'चौकार'; बटलरचे शतक

**शारजा : वृत्तसंस्था**

यष्टीरक्षक-फलंदाज जोस बटलरने (६७ चेंडूत नाबाद १०१ धावा) साकारलेल्या अप्रतिम शतकाच्या जोरावर इंग्लंडने सोमवारी ट्वेन्टी-२० विश्वचषकात श्रीलंकेवर २६ धावांनी मात केली. सलग चौथ्या विजयासह इंग्लंडने उपांत्य फेरीतील प्रवेश जवळपास निश्चित केला आहे.



सुपर-१२ फेरीतील या सामन्यात इंग्लंडने दिलेल्या १६४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव १९ षटकांत १३७ धावांत आटोपला. श्रीलंकेचे सलामीवीर पाथुम निसंका (१) आणि कुसाल परेरा (७) लवकर बाद झाले. चरिथ असलंका (२१) आणि भानुका राजपक्षे (२६) यांच्या योगदानानंतर वानिंदू हसरंगा (३४) आणि कर्णधार दसून शानका (२६) यांनी फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना श्रीलंकेला विजय मिळवून देता आला नाही.

तत्पूर्वी, इंग्लंडने २० षटकांत ४ बाद १६३ अशी धावसंख्या उभारली. जेसन रॉय (९), डेव्हिड मलान (६) आणि जॉनी बेअरस्टो (०) झटपट माघारी परतल्याने इंग्लंडची एकवेळ ३ बाद ३५ अशी अवस्था झाली, पण बटलर आणि कर्णधार ईऑन मॉर्गन (४०) यांनी इंग्लंडला सावरले. मॉर्गन बाद झाल्यावरही बटलरने फटकेबाजी सुरू ठेवताना अखेरच्या चेंडूवर षटकार मारत शतक पूर्ण केले. त्याचे हे आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील पहिलेवहिले शतक ठरले. बटलरच्या नाबाद १०१ धावांच्या खेळी प्रत्येकी सहा चौकार व षटकारांचा समावेश होता. इंग्लंडने अखेरच्या १० षटकांत ११६ धावा कुठल्या.




# युवराज पुन्हा मैदानात उतरणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सिक्सर किंग म्हणून ओळखला जाणारा भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंग याने क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर एक आश्चर्यकारक निर्णय घेतला आहे. आपण पुन्हा एकदा मैदानात उतरणार असल्याची घोषणा त्याने इन्स्टाग्रामवरील पोस्टद्वारे केलीय.

युवराजने इन्स्टावर एक व्हिडीओ पोस्ट केला असून यामध्ये त्याने केलेल्या काही अप्रतिम खेळींचा दाखला दिला आहे, तसेच या व्हिडीओसाठी एक डिस्क्रिप्शनही दिलेय. यामध्ये त्याने म्हटले आहे की, देवच तुमचे नशीब ठरवतो. चाहत्यांच्या प्रेमाखातर मी फेब्रुवारीमध्ये पुन्हा एकदा पीचवर उतरेल अशी आहे. या भावनेसारखे दुसरे काहीही नाही. तुमच्या प्रेमाबद्दल आणि शुभेच्छांबद्दल धन्यवाद. माझ्यासाठी या शुभेच्छा ही खूप मोठी बाब आहे. सपोर्ट करीत राहा ही आमची टीम आहे आणि खरा चाहता कठीण काळात त्याचा पाठिंबा दाखवेल.

## पंचावर कारवाई

**दुबई** : टी-२० वर्ल्डकपमध्ये इंग्लिश पंच मायकल गॉफ यांनी बायो-बबल नियमांचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे गॉफ यांच्यावर सहा दिवसांचा प्रतिबंध लावण्यात आला आहे. गॉफ यांना क्वारंटाइन करण्यात आले असून आयसीसी अधिकारी अधिक चौकशी करीत आहेत.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com